Shikshan Prasarak Mandal's

# S P M POLYTECHNIC,KUMATHE

HOTGI ROAD, SOLAPUR-413224,Phone: 9503907130
Web Site:- www.spmsolapur.org
Email:- spmpkprincipal@gmail.com

REF NO: SPMPK/O.O./2023-24/76 DATE: 26th July 2023

# Office Order

## ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT PROGRAM CELL

Entrepreneurship Development Program Cell Member for Academic Year 2023-24

| Sr. No. | Name of Member | Designation | Appointed As |
|---|---|---|---|
| 1 | Mr. Rohini Chavan | Principal | Chairman |
| 2 | Mr. Dnyaneshwar Jadhav | Lecturer | Secretary |
| 3 | Mrs. Snehal Gaikwad | Lecturer | Member |
| 4 | Mr. Somnath Thalange | Lecturer | Member |
| 5 | Mr. Bapu Gade | Lecturer | Member |

(Mrs. Rohini Chavan)
**PRINCIPAL**

Shikshan Prasarak Mandal's Polytechnic
SOLAPUR
Kumathe


SPM Polytechnic
Kumathe, Solapur
Organises
ENTREPRENEURSHIP
AWARENESS CAMP
IN ASSOCIATION WITH
THE INSTITUTION OF ENGINEERS (I)
SOLAPUR LOCAL CENTRE
MARCH 11-12,2023


SPM Polytechnic
Organises
ENTREPRENEURSHIP
AWARENESS CAMP
IN ASSOCIATION WITH
THE INSTITUTION OF ENGINEERS (I)
SPM

# उद्योजकता विकास कार्यशाळा 'एसपीएम'मध्ये उत्साहात



संचार प्रतिनिधी

▶ सोलापूर, दि. १४- कुमठे येथील एसपीएम पॉलिटेक्निक येथे दोनदिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळा संपन्न झाली. ही कार्यशाळा एसपीएम व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) सोलापूर, लोकल सेंटर यांच्या सहकार्याने आयोजित केली होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्या रोहिणी चव्हाण यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर विविध विभागांचे विभागप्रमुख व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख उपस्थित होते.

पहिल्या सत्रात प्रा. मनोज कुलकर्णी यांनी उद्योजक आणि उद्योजकता यामधील सहसंबंध स्पष्ट केला व विद्यार्थ्यांना नोकरीच्या पाठीमागे न लागता उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन केले. त्याबरोबरच त्यांनी उद्योजकतेत संवाद कौशल्याचे महत्त्व अधोरेखित केले.

द्वितीय सत्रात प्रा. शेखर जेऊरकर यांनी उद्योग जगतातील उपलब्ध असणाऱ्या संधींचे उदाहरणांसह सादरीकरण केले. या क्षेत्रात शासनाकडून मिळणाऱ्या सोयी व सवलतींची सखोल माहिती दिली. लीना इंडस्ट्रीचे प्रमुख सुधीर पळसुले यांनी भावी अभियंत्यांना उद्योग जगतातील चालू घडामोडींविषयी सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांनी उद्योजकतेची कास धरावी, असे आवाहन केले. प्रसिद्ध उद्योजकांच्या मुलाखतींमध्ये सुधीर पळसुले, आकांक्षा शेंडगे व ड्रीम टेक्नॉलॉजीचे श्रीकांत कदम यांची प्रकट मुलाखत प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी घेतली. मुलाखतीमध्ये मान्यवरांनी आपला जीवन प्रवास कथन केला व उद्योग उभारणीसाठी आवश्यक असलेल्या गुणांची पायाभरणी कॉलेज जीवनातच होते, असे स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांनासुद्धा समर्पक उत्तरे दिली.

ही कार्यशाळा आयोजन करण्यासाठी संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त प्रा. स्वाती माने यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलप्रमुख प्रा. बसवराज स्वामी, वरिष्ठ प्राध्यापक मल्लेशी बगले, प्रा. सोमनाथ थळंगे, प्रा. अनंत चौधरी, प्रा. बापू गाडे व विभागप्रमुखांनी परिश्रम घेतले.

# ‘एसपीएम’मध्ये दोन दिवसांची उद्योजकता विकास कार्यशाळा

सोलापूर, ता. १६ : कुमठे येथील एसपीएम पॉलिटेक्निकमध्ये दोन दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळा झाली. एसपीएम व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्सची सोलापूर शाखा यांच्या सहकार्याने झाली. प्राचार्या रोहिणी चव्हाण यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

पहिल्या दिवशी, पहिल्या सत्रात प्रा. मनोज कुलकर्णी यांनी उद्योजक आणि उद्योजकता यामधील सहसंबंध स्पष्ट केला व विद्यार्थ्यांना नोकरीच्या मागे न लागता उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन केले. त्याबरोबरच त्यांनी उद्योजकतेत संवाद कौशल्याचे महत्त्व अधोरेखित केले. द्वितीय सत्रात प्रा. शेखर जेऊरकर यांनी उद्योग जगतातील उपलब्ध असणाऱ्या संधीचे सोदाहरण सादरीकरण केले. या क्षेत्रात शासनाकडून मिळणाऱ्या सोयी व सवलतीची सखोल माहिती दिली.

दुसऱ्या दिवशी लीना इंडस्ट्रीचे प्रमुख सुधीर पळसुले यांनी भावी अभियंतांना उद्योग जगतातील चालू घडामोडीविषयी सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांनी उद्योजकतेची कास धरावी, असे आवाहन केले. दुपारच्या सत्रात प्रसिद्ध उद्योजकांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. सदर मुलाखतीमध्ये सुधीर पळसुले, आयेशा शेख व ड्रीम टेक्नॉलॉजीचे श्रीकांत कदम यांची प्रकट मुलाखत प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी घेतली. कार्यशाळेसाठी मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वास्त प्रा. स्वाती माने यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल प्रमुख प्रा. बसवराज स्वामी, वरिष्ठ प्राध्यापक मलेशी बगले, प्रा. सोमनाथ थलंगे, प्रा. अनंत चौधरी, प्रा. बापू गाडे व विभाग प्रमुखांनी परिश्रम घेतले.